-6 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# प्रश्नांच्या निर्गतीसाठी संयुक्त प्रयत्न हवेत

## डॉ. तारा भवाळकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

काळाच्या पुढचा विचार करून समाजातील स्त्री-पुरुष समानतेसाठी महात्मा फुले यांनी केलेल्या प्रयत्नांना सावित्रीबाई फुले यांनी मोलाची साथ दिली. यातूनच प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी स्त्री-पुरुषांच्या संयुक्त प्रयत्नांची गरज अधोरेखित होते, असे प्रतिपादन डॉ. तारा भवाळकर यांनी केले. त्या शिवाजी विद्यापीठ सेवक संघातर्फे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, प्रश्न हे केवळ महिलांचे किंवा पुरुषांचे नसतात तर ते समाजाचे असतात. आजही खऱ्या अर्थाने समानता आली का? याचा विचार अंतर्मुख होऊन करणे गरजेचे आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष समानतेसाठी स्त्री सबलीकरणाची फुले दाम्पत्यांची चळवळ पुढे नेण्याची गरज आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ सेवक संघातर्फे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. तारा भवाळकर.

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदवडेकर यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत यश संपादन करणाऱ्या महिलांची माहिती दिली. अशा महिलांकडून प्रेरणा घेऊन विद्यापीठातील महिला काम करतील, असा विश्वास व्यक्त केला. स्वागत सुरेखा आडके यांनी केले तर प्रास्ताविक रमेश पोवार यांनी केले. रत्नमाला साळुंखे यांनी आभार मानले. कार्यक्रमास परीक्षा नियंत्रक महेश काकडे तसेच सेवक संघाचे पदाधिकारी अतुल ऐतावडेकर, मिलिंद भोसले, विष्णू खाडे, अनिल साळोखे, अजय आयरेकर यांच्यासह कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

-6 JAN 2017

Times of India

# University exams for sports quota students from Jan 17

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Starting January 17, the Shivaji University, Kolhapur (SUK) students who were involved in sports activities through the year will be able to take the semester examination.

A circular from the controller of examinations (CoE), Mahesh Kakade, stated, "October and November months are the peak months for various athletic competitions. The players, who participate in these events, are busy in it, due to which their semester examinations are missed. According to the decision by the board of examinations, these students will have to appear for their examination from January 17."

The department has published the schedule and examination centre for these students, to appear for the exam. Students can use the hall tickets that they were given for the October/November semester examination.

The KIT College of Engineering, Shahaji Law College, Dr Padmasinh Patil College of Physical Education, Miraj and Nanasaheb Mahadik College of Engineering will host the exam for the students of engineering, law and education. For the arts, commerce and science courses, six different colleges have been assigned.

**KIT College of Engineering, Shahaji Law College, Dr Padmasinh Patil College of Physical Education, Miraj and Nanasaheb Mahadik College of Engineering will host the exams for students of engineering, law and education**



The university's October examination has ended in December. The results of most of these examinations have already been announced, officials said.

The university will withdraw the results of the winter examination by January 15.